डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद



व

पी.ई.एस.मुंबईचे,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय,

नागसेनवन, औरंगाबाद (महा.)

यांच्या संयुक्त विद्यमान

एक दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्र

# Recent Trends In Teaching & Research : Opportunities, Nature and Features

# आधुनिक अध्यापन संशोधनाचे प्रवाह : संधी, स्वरुप व वैशिष्ट्ये

दिनांक : ३ ऑक्टोबर २०१५

भाग - १

AJANTA PRAKASHAN

NATIONAL CONFERNCE - 2015 ISBN : 978-93-83587-33-9

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

व



पी.ई.एस.मुंबईचे,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य

महाविद्यालय, नागसेनवन, औरंगाबाद (महा.)

यांच्या संयुक्त विद्यमान

एक दिवसीय आंतरविद्याशाखीय

राष्ट्रीय चर्चासत्र

# आधुनिक अध्यापन संशोधनाचे प्रवाह : संधी, स्वरुप व वैशिष्ट्ये

दिनांक : ३ ऑक्टोबर २०१५

## मराठी भाग - १

संपादक

प्र. प्राचार्य

**डॉ. किशोर साळवे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय, नागसेनवन, औरंगाबाद (महा.)

**Ajanta Parkashan,**

Jaisingpura, Aurangabad.

 ISBN : 978-93-83587-33-9

# मराठी अनुक्रमाणिका भाग - १


| अ.क्र. | नाव आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २७ | भारतीय भाषांच्या उत्पत्तीत पालि-भाषेचे स्थान<br>वर्षा कचरू आगळे | ९६-९८ |
| २८ | महिला आरक्षण कायदा व महिला सक्षमीकरण<br>म्हस्के अनिल लक्ष्मण | ९९-१०३ |
| २९ | जुंदरी लोकसाहित्य संषोधन स्वरूप<br>प्रा. डॉ. द. प्र. डुंबरे | १०४-१०६ |
| ३० | सामाजिक संशोधनातील ई - लर्निंगचे महत्त्व<br>प्रा. जयसिंग पोपटसिंग सिंगल | १०७-११३ |
| ३१ | वृध्द आणि मानवी अधिकार (जागतिक परिस्थितीच्या संदर्भात)<br>कोमल भैय्यासाहेब वाहुळे | ११४-११९ |
| ३२ | मराठी भाषेचे महाविद्यालय स्तरावरील अद्यापन<br>प्रा. कैलास सुदामराव वानखडे | १२०-१२२ |
| ३३ | कलाशिक्षण काळाची गरज<br>प्रा. जितेंद्र के. पवार | १२३-१२६ |
| ३४ | स्मृती प्रतिमान: प्रशिक्षण कार्यनिती<br>डॉ. विजया विनायक पाटील | १२७-१३० |
| ३५ | भारतीय भाषेच्या विकासात पालि भाषेचे योगदान<br>प्रा. राजेश व्ही. चौरपगार | १३१-१३३ |
| ३६ | तौलनिक साहित्य<br>प्रा. शिवाजी सिरसाठ | १३४-१३६ |
| ३७ | राजकीय समाजशास्त्राचे वास्तव स्वरुप आणि संशोधन विषयक दृष्टिकोन<br>डॉ. आर. व्ही. मस्के | १३७-१३८ |
| ३८ | भारतीय प्राचीन पाली भाषेची प्रासंगिकता किंवा महत्व<br>आयु. बाळासाहेब भीमराव अंभोरे | १३९-१४१ |
| ३९ | अनुवादित साहित्य<br>विलास चुडामन बोथीकर | १४२-१४४ |
| ४० | आधुनिक भारतातील वृध्दांच्या समस्या<br>राजेंद्र फकिरराव बगाटे | १४५-१४९ |
| ४१ | प्रशासन, अध्यापन संशोधन बाबतचे कायदे<br>ॲड. शिवकुमार वसंतराव देशमुख | १५०-१५३ |

- ३४ -

# स्मृती प्रतिमानः प्रशिक्षण कार्यनिती

डॉ. विजया विनायक पाटील

सहा. प्राध्यापक शिक्षणशास्त्र विदयाशाखा, य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक.

## १) प्रास्ताविक

शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमात अध्यापनाची प्रतिमानेचा समावेश करण्यात आलेला आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठानेही पुर्नरचित बी.एड. अभ्यासक्रमात विविध अध्यापन प्रतिमांनाचा समावेश केलेला आहे. संशोधिकेने स्मृती प्रतिमाना वर आधारीत स्वयं अध्यापन साहित्य शिक्षक प्रशिक्षकांसाठी विकसीत केले व प्रत्यक्ष क्षेत्रीय चाचणी घेत परिणामकारता पाहिली. अध्यापन प्रतिमानाचे प्रशिक्षण ही संकल्पना शिक्षक-प्रशिक्षणात राबविणे हे महत्वाचे कार्य आहे.

प्रस्तृत शोधनिबंधात स्मृती प्रतिमान हया प्रतिमानाचे स्वयं-अध्यापन साहित्यावर आधारित प्रशिक्षण कार्यनाती विषयी विवेचनात्मक वर्णन देण्यात आलेले आहे.

### १.१) अध्यापन-प्रतिमाने संकल्पना

ब्रुस जॉईस व मार्शा वील यांच्या मते, अध्यापनाची प्रतिमाने हे अध्यापनाचे विविध मार्ग आहेत. 'अध्यापन प्रतिमाने' ह्या संकल्पनेमुळे अध्यापनाची एकच एक चांगली पद्धत असू शकते अशा भ्रामक समजुतीस जबरदस्त धक्का पोहचला आहे. ह्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे वेगवेगळया उद्दिष्टांसाठी वेगवेगळी अध्यापन पद्धती वापरली जाते. 'मॉडेल' किंवा 'प्रतिमाने' ह्यांच्या ब्रुस जॉईस आणि मार्शा वील यांनी पुढीलप्रमाणे व्याख्या केलेल्या आहेत.

१) सुस्थिर तत्त्वांद्वारे विद्यार्थी व शिक्षक ह्यांनी परस्पर सहकार्याने वर्गामध्ये तयार केलेले वातावरण म्हणजे अध्यापनाची प्रतिमाने होय ( जोशी, १९९४ ).

२) वर्गामध्ये अथवा अन्य परिस्थितीत अध्यापनासाठी मार्गदर्शन करू शकणारे आकृतिबंध किंवा आराखडा म्हणजे अध्यापनाचे प्रतिमाने होय (जॉईस व वील, १९७२).

#### १.१.१) अध्यापन प्रतिमानांची वैशिष्ट्यपूर्ण मांडणी

ब्रुस जॉईस व मार्शा विल यांनी प्रत्येक प्रतिमानांचे वर्णन व मांडणी विशिष्ट पद्धतीने केली आहे. प्रत्येक प्रतिमान हे पुढील पाच मूलभूत घटकांवर आधारलेले आहे.

**प्रतिमानांचे पदबंध (Syntact)**

कोणत्याही प्रतिमानांचा वर्गात प्रत्यक्ष वापर करताना तो विशिष्ट पायऱ्यांनी व क्रमाने केला जातो व त्यात कृतीचे विश्लेषण असते. ह्या रचनेलाच 'प्रतिमानांचा पदबंध' असे म्हणतात.

**सामाजिक प्रणाली (Social System)**

सामाजिक प्रणालीमध्ये विद्यार्थी व शिक्षक यांनी वर्गात करावयाच्या विविध भूमिका आणि त्यांच्यातील परस्परसंबंध यांचा समावेश होतो. काही प्रतिमानामध्ये शिक्षक हे समूहकार्याचे प्रेरक (Facilitator) किंवा विमर्षक (Reflector) असतात. तर काही प्रतिमानामध्ये व्यक्ती संमंत्रक तसेच विहित कार्य करवून घेणारे (Task Master) असतात.

**प्रतिक्रियेची तत्त्वे (Principles of Reactions)**

प्रत्येक प्रतिमानासाठी विद्यार्थ्यांकडून मिळणाऱ्या प्रतिसादासाठी शिक्षकाने कोणती व कशी प्रतिक्रिया व्यक्त करावयाची ह्याबाबतची मार्गदर्शक तत्त्वे निश्चित आहेत. त्या तत्त्वांनुसारच शिक्षकाने कृती करावयाच्या आहेत. शिक्षकाच्या प्रतिक्रियेची तत्त्वे प्रतिमानारूप बदलतात.